प्रकरण दोन

# मूल्य-अर्थ, महत्त्व व अध्यापन

## प्रकरण दुसरे

## मूल्य-अर्थ, महत्त्व व अध्यापन


| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| २.१ | मूल्य-अर्थ आणि व्याप्ती | 21 |
| २.२ | मूल्य निर्मिती पूर्वेतिहास | 26 |
| २.२.१ | आध्यात्मवादाची मूल्यविषयक भूमिका | 27 |
| २.२.२ | निसर्गवादाची मूल्यविषयक भूमिका | 28 |
| २.२.३ | कार्यवादाची मूल्यविषयक भूमिका | 28 |
| २.२.४ | वास्तववादाची मूल्यविषयक भूमिका | 29 |
| २.२.५ | अस्तित्ववादाची मूल्यविषयक भूमिका | 30 |
| २.२.६ | तार्किक अनुभववादाची मूल्यविषयक भूमिका | 30 |
| २.३ | मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान | 32 |
| २.४ | मूल्यसंक्रमण - अर्थ | 36 |
| २.५ | मूल्यसंक्रमण आणि शिक्षण यांचा अन्योन्यसंबंध | 37 |
| २.६ | मूल्यसंक्रमणात शिक्षण आणि शिक्षक यांची भूमिका | 38 |
| २.७ | समारोप | 40 |

# प्रकरण दोन

## मूल्य - अर्थ, महत्त्व व अध्यापन

### २.१ मूल्य - अर्थ आणि व्याख्या :

"Education is the manifestation of the perfection already in man" असे स्वामी विवेकानंद म्हणतात. ' माणसामध्ये अंगभूत असणाऱ्या पूर्णत्वाचा आविष्कार म्हणजे शिक्षण ' असे म्हणत असताना आपण ' पूर्णत्व ' या शब्दाचा अर्थ काय हे पाहिले पाहिजे.

"Perfection in man is the state of harmony and balance between his attitudes, action behaviour, character, skills, thinking patterns and maintenance of human relations. Social awareness, open mindness, sense of sacrifice, unselfishness, development of insights, etc. are the essential qualities and characteristics of human perfection. The perfection in man is nothing but the versatile development of his personality."[1]

पूर्णत्व म्हणजे माणसाचा अष्टपैलू विकास मानला असल्याचे डॉ. शिवनारायण यांनी व्यक्तीमध्ये असणाऱ्या दृष्टीकोन, कृती, वर्तन, चारित्र्य, कौशल्य, मानव संबंधाबद्दलची विचार करण्याची पध्दती यातील संतुलन याला अधिक महत्त्व देऊन सामाजिक जाणीव, त्यागवृत्ती, उदारमनता, व्यक्तिमत्त्वातील अंतर्विकास यांना मानवी पूर्णत्वाचे गुण आणि वैशिष्ट्य मानले आहे.

मूल्य ( Value ) या संकल्पनेचा मानवी जीवनाच्या संदर्भात विचार करीत असताना प्रो. शिवनारायण ` पूर्णत्वा ` मध्ये अभिप्रेत असलेल्या गोष्टी या मानवी जीवनमूल्ये आहेत हे मान्य करतात. अर्थात व्यक्तीमध्ये प्रतिबिंबित झालेली मूल्ये ही समाजामध्ये परीस्थिती, निरनिराळी बात असतात. मानवी मूल्ये या संकल्पनेचा विचार सामाजिक दृष्टीकोनातून करावा लागतो. व्यक्तिगत मूल्यांच्या बाबतीत हे म्हणणे कुणीचे वाटण्याची शक्यता आहे. पण व्यक्तिगत मूल्यांची निष्ठा देखील त्या मूल्यांचे वर्तन समाजात झाल्यानंतरच ठरत असते. ` आत्मसंयम ` हे मूल्य व्यक्तिगत मूल्ये आहे आणि व्यक्तिगत पातळीवर हे मूल्य काही म्हणजे झाले. सामाजिक दृष्टीकोनातून या मूल्याचा विचार करण्याची काय गरज आहे ? असे वाटेल तरी, ` आत्मसंयम ` या मूल्याची निष्ठा ही त्या मूल्याचे समाजात करणाऱ्या वर्तनाने अधिक ठरत असते. समाजात हे वर्तन त्याच्या व्यक्तिमत्वामध्ये घडत असते.

तसेच पुढे असे की, सामाजिक वातावरणात व्यक्ती घडत असते, आणि काही वेळा, वेळा व्यक्ती समाजाशी वळण देत असतात. हे घडणे, वळण देणे परस्पर आंतरक्रियेतून चालू असते. समाजाच्या पाठीमागे मानवी संस्कृती, आणि मानवी इतिहास असतो. इतिहास, संस्कृतीच्या अवलोकनातून परीशीलनातून माणसाने समाजामध्ये वागावे कसे, वाटावे कसे, जोडावे कसे, आपले वर्तन ठेवावे कसे याविषयी समाज काही आडाखे बांधत असतो. मानवी जीवनातील ` ऋत ` या विचार करून प्रत्येक व्यक्तीने हे आडाखे पाळावेत, आपल्या स्वभावात त्यांना स्थान देऊन वर्तनातून त्याचे दृश्य रूप प्रकट करावे असे समाज अपेक्षित असतो.

याचा अर्थ असा होतो की, मूल्याचा विचार करताना समाजाचा विचार करावा लागतो. वरील सर्व गोष्टींचा विचार करून मूल्याची व्याख्या खालीलप्रमाणे करता येईल.

" मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वातील ज्या ज्या गोष्टींना समाजामध्ये ' मूल्य ' आहे ती गोष्ट म्हणजे ' मूल्य ' होय."

कोणती मूल्ये आपण आचरणात आणायचीत, धारण करून जीवन संपन्न करायचे याचे व्यक्तीला स्वातंत्र्य असते, तरी समाज संस्कृतीच्या निरीक्षणातून आणि परिशीलनातून मूल्यांची निर्मिती झालेली असते. मूल्य आचरणात आणताना व्यक्ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या समाजहिताला बांधील असते.

" नैतिक, बौद्धिक अथवा सौंदर्य विषयक दृष्टीकोनातून आपल्याला ज्या बद्दली पसंती वाटते त्यालाच मूल्य म्हणता येईल."[2]

असे लीला पाटील यांना वाटते. अर्थात ही त्यांची व्याख्या व्यक्तिमत्त्वाच्या पसंती, नापसंतीच्या दृष्टीकोनातून केलेली आढळते. तरीही त्यांनी मूल्यांमधील सामाजिक जाणीव अपेक्षिलेली दिसते.

" मूल्य हा शब्द आपल्या मनोधारणेची विशिष्ट स्थिती वा घडण दाखविते."[3] असे दि.य. जस्तुधे यांना वाटते.

' मूल्य ' या शब्दाला इंग्रजीमध्ये Value असा प्रतिशब्द आहे. 'Value' या कोषा अर्थ खालीलप्रमाणे आहे :

'Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal."[4]

येथे ' मूल्यशिक्षण ' हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे. ' मूल्य ' म्हणजे माणसाच्या स्वभावातील ' सत् ' ची निर्मिती

होय. म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कारांचे रोपण मानावे लागते. मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सद्गुणांचे रोपण करण्यासाठी त्या स्वरूपाचे संस्कार मुलांच्यावर करावे लागतात. हे संस्कार शिक्षणानेच शक्य आहेत. म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कार असे म्हटले आहे. मानवी संस्कृतीतील सद्गुणांनी ` मूल्य ` ही संज्ञा निर्माण केली आहे. येथे समूहजनाचा, समूह-जीवनाचा, व्यक्तीच्या सामाजिक व्यवहाराच्या आशा-आकांक्षांचा विचार अभिप्रेत आहे. सामाजिक जीवनात व्यक्तीवर्तन, व्यवहार जीवन कसे असावे याचे आदर्शीकरण ` मूल्य ` या संज्ञेमध्ये अपेक्षित आहे.

मूल्य आणि समाज, मूल्य आणि इतिहास, मूल्य आणि संस्कृती, मूल्य व व्यक्ती यांचा परस्पर संबंध वरील स्पष्टीकरणाच्या आधारे लक्षात येतो. म्हणूनच व्यक्तीची समाजामध्ये मूल्यांचा ऱ्हास होत चालला आहे असे म्हटले जाते तेव्हा ते साधार पटवून देण्यासाठी लोक इतिहासाचा आणि इतिहासामध्ये असलेल्या संस्कृतीचा आधार घेताना दिसतात.

इतिहासाचे अवजड ओझे
डोक्यावर घेऊनी ना नाचा
करा त्याचे पदस्थल
त्यावर उभे भविष्य वाचा[1]

(` [illegible] ` - विं.दा.करंदीकर)

या विंदांच्या म्हणण्यामध्ये म्हणूनच तथ्य दिसते. मानवी संस्कृतीने मानवाला बहाल केलेल्या ` सद्गुणांचे ` संवर्धन आणि संक्रमण करत राहणे म्हणजेच मूल्य जपणे होय असा अर्थ अभिप्रेत असतो. मूल्य या संकल्पनेचा अर्थ पाहिला ` मूल्य ` संकल्पनेची व्याप्ती पहायची आहे.

मूल्यांसंबंधीतील बऱ्याच पुस्तकांमध्ये कालानुरूप मूल्ये बदलत असतात असा स्वरूपाचे मत मांडलेले पहावयास मिळते. पण या मतामध्ये तथ्य किती हे पडताळून पाहिले पाहिजे. संकल्प आणि संकल्पातून मानवी विकास हे मानवी संस्कृतीचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. आदिमानव कालखंडापासून ते आजतागायत मानवी संस्कृतीने आपल्या मानवी जीवनाचे जे सर्वश्रेष्ठ संचित संकलित केलेले आहे. यातील 'सत्य' या संकल्पनेचे संशोधन करण्याचा ध्यास अनेकांनी मानवाने घेतलेला दिसतो. आणि त्यातूनच मानवी जीवनाचा कल्याणाप्रत विकास होत आल्याचे आपणास पहावयास मिळते. म्हणून मूल्ये बदलत असतात असे म्हणण्यापेक्षा मूल्ये अधिक वाढत असतात, त्यांच्या संख्येमध्ये वृद्धी होत असते असे म्हणणेच साधार सिद्ध करता येते. पूर्वप्रचलित गोष्टींचा विचार टाकल्याने कालांतराने उत्तर काळात अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टींकडे तो अधिक आकृष्ट होतो हे जरी असले तरी मानवी मनाने ठरविलेले 'सत्य' हे मानवी जीवनासंबंधात त्रिकालाबाधित 'सत्य' असते. म्हणून मूल्ये बदलत नसतात तर ती वाढत असतात असे म्हटले आहे.

हे खरे आहे की, कालौघामध्ये विशिष्ट मूल्यांची गरज त्या त्या समाजाला कमी अधिक प्रमाणात भासत असते. ही गरज तत्कालीन समाज परिस्थितीच्या इच्छा, आशा-आकांक्षेतून आणि मानवी विकासाच्या हेतूतून कमी-जास्त होत असते. 'भक्ती' हे मूल्य काल होते, आज आहे आणि उद्याही राहणार आहे. फरक एवढाच की प्राचीन काळात धर्म हा समाजाचा मूलाधार असल्याने 'भक्ती' या मूल्याचे महत्त्व त्या समाजाला अधिक वाटले. आजचा आंतरराष्ट्रीय ऐक्याचा विचार करणारा मानव 'भक्ती' हे मूल्य व्यक्तिगत पातळीवर जपायला हरकत नाही असे म्हणू लागला आहे. याचा अर्थ 'भक्ती' हे मूल्य बदलले, मानवी समाजातून नाहीसे झाले असे म्हणता येत नाही.

ब-याच वेळा वरील पध्दतीने काही गोष्टींना मूल्ये मानल्याने मूल्ये बदलतात असा समज होण्याची शक्यता असते. ` धर्म ` या शब्दाचा अर्थ, ` जी समाजधारणा करते ती धर्म ` असा आहे. या अर्थाने विचार केल्यास धर्म हे मूल्य होय. ` धर्म ` या ऐवजी ` धर्मा ` च्या नावाखाली इतिहासामध्ये घडलेल्या मानवी अहिताच्या गोष्टींचा निर्देश करून पाहिले की ` धर्म ` कुचकामी वाटाया लागतो. अशा पध्दतीने विचार करणा-यांना आधुनिक काळात धर्मकांडाचे बुरुज ढासळत असलेले पहावयास मिळतात व त्यांच्या दृष्टीने ` धर्म ` हे बदलणारे मूल्य ठरते. पण जी समाजधारणा योग्य रहावी यासाठी प्रयत्नशील राहते ती धर्म कोणत्याही काळात बदलायचे कारण नसावे.

यावरून असे स्पष्ट होते की, मूल्ये बदलत नसतात, तर ती शाश्वत असतात. आणि ती मानवी प्रगतीची प्रतिके असतात.

२.२ <u>मूल्यनिर्मिती पूर्वेतिहास</u> :

मानवी जीवनमूल्यांचा शोध हा अध्यात्मापासून ते विज्ञानापर्यन्त आत्मिक विकासापासून ते भौतिक प्रगतीपर्यन्त, शारीरिक स्वास्थ्यापासून ते मानसिक स्वास्थ्यापर्यन्त, आणि समूहजीवनातील अनेक प्रणालींपासून (राजकीय, सामाजिक,आर्थिक) ते व्यक्ती स्वातंत्र्यापर्यन्त होत आलेला आहे. कारण मनुष्य हा Crown of Creation आहे हे त्याने आपल्या कर्तृत्वाने सिध्द केले आहे. चराचर सृष्टीचा मुकुटमणी असणा-या मानवाने आपल्या बुध्दीवैभवाने, आपल्या मानसिक व आत्मिक विकासाने विकसित केलेल्या जीवन प्रवाहामध्ये त्याच्या प्रगल्भ होत जाणाऱ्या मनोभूमिकेचे टप्पे आढळतात. या टप्प्यांचे अवलोकन केल्यानंतर ` मूल्य ` ही कल्पना मानवी जीवनप्रवाहातील आवश्यक गरज ठरली आहे आणि या कल्पनेचे विकसन कसे होत गेले हे पाहता येईल. मूल्यनिर्मितीच्या दृष्टीकोनातून त्या टप्प्यांचे अवलोकन करायचे आहे.

२.२.१ आध्यात्मवादाची मूल्यविषयक भूमिका :

सृष्टीतील विस्मयकारी, भयावह आणि आनंददायी घडामोडींनी ईश्वराचे अस्तित्व मान्य करण्याकडे झुकलेला आध्यात्मवादी आदर्श जीवन का व कसे जगावे याची चर्चा करताना आपणास आढळतो. प्राचीन भारता बरोबरच प्राचीन युरोपमध्ये 'सत्यं, शिवं, सुंदरम्' ही चिरंतन मानवी मूल्ये मानल्याचे दिसून येते. सृष्टीच्या आणि स्वतःच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान करून घेणे हे म्हणून कल्याणमय आहे. आणि हे सत्य व शिव आहे तेच जीवनाला यथार्थता देत असल्याने सुंदर आहे. म्हणून ही त्रिमूर्ती ही चिरंतन ध्येय असे म्हटले आहे. अर्थात या चिरंतन मूल्यांच्या प्रकटीकरणासाठी नीतीमय जीवन (नैतिक मूल्य), कल्याणकारी वर्तन (शिव). सौंदर्याभिरुची (सुंदरम्) अशी मूल्ये गृहित धरली गेली. सर्वभूती परमेश्वर अशी कल्पना ग्राह्य मानल्याने 'बंधुभाव' 'भूतदया' या सारखी मूल्ये आध्यात्मवादात प्रमाण मानली गेली. नैतिक मूल्यसंवर्धनासाठी म्हणून मांडून दिलेल्या आचरणामध्ये आचार शुध्दता, विचार शुध्दता, उच्चार शुध्दता ही वैयक्तिक स्वतंत्र मूल्ये मानली गेली. त्याच बरोबर अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, बंधुभाव, इंद्रियनिग्रह ही मूल्ये मनुष्याच्या उत्कर्षास आवश्यक आहेत असे मानले गेले. षड्रिपू मानवाला आदर्श जीवनापासून भ्रष्ट करतात. म्हणून 'आत्मसंयमन' हे मूल्य महत्त्वाचे मानले गेले. मनुष्याला कलाजीवनपूर्ण, विकासपूर्ण जीवन जगण्यासाठी कलोपासना, निसर्ग आस्वादाचा उपयोग झाल्याने 'सौंदर्याभिरुची' हे मूल्य ही महत्त्वाचे ठरले गेले. मूल्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला असता तत्त्वज्ञानाच्या विकासातील या पहिल्या टप्प्याने आपल्या परीने संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या सार्थक जीवनसंबंधीचा विचार केलेला आहे. त्याच बरोबर समाजमनाचा आणि समाजहिताबाबतचा विचार केलेला पहावयास मिळतो. म्हणूनच आपण आध्यात्मवादाला आदर्शवाद असे संबोधतो.

### २.२.२ निरीश्वरवादाची मूल्यविषयक भूमिका :

`परमेश्वर` या संकल्पनेतील अमूर्तता आणि ती आकलून घेण्यातील काठिण्य यामुळे बुद्धीचे वरदान लाभलेल्या मनुष्याने प्रत्यक्ष दिसणारी चराचर सृष्टी `प्रमाण` मानली आणि निरीश्वरवादाचा उदय झाला. [illegible] या निरीश्वरवादाचा उदय हा तत्कालीन समाज परिस्थितीतील दोषांचे निर्मूलन करण्याच्या उमेदीनेच झालेला पहावयास मिळतो. समाजातील कृत्रिम भेदभाव, अन्याय, जुलूम, यांच्यावर कडक टीका करून जीन जॅक्स रूसो (१७१२–७८) ने समाजात स्वातंत्र्य, बंधुत्व व समता ही मूल्ये असली पाहिजेत असे प्रतिपादन केले.

निरीश्वरवादी स्वातंत्र्य, निसर्ग प्रेम, परस्परांप्रती आदर, स्वावलंबनक्षमता, प्रयत्नवाद, सहजीवन संवर्धन, सौंदर्याभिरुची यासारख्या मूल्यांचे आचरण करताना दिसतात. निरीश्वरवाद्यांनी नैतिक जीवनावर भर देऊन `स्वातंत्र्य` मूल्यावर अधिक भर केंद्रित केले तरी त्यांनी व्यक्ती म्हणून माणसाला दिलेले महत्त्व असाधारण आहे. जीवनानंद मिळविण्यासाठी शक्ती, बुद्धी, कृती यांचा वापर करावा याचे मार्गदर्शन निरीश्वरवादी करताना दिसतात. याचा अर्थ त्यांच्या तत्त्वज्ञानाचा स्पष्ट भर मानवी कल्याण हाच ठरतो. म्हणून त्यांचे तत्त्वज्ञान मूल्य शोधनाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरते.

### २.२.३ कार्यवादाची मूल्यविषयक भूमिका :

वर्तमानकाळाला अधिक महत्त्व देऊन अनुभव हाच श्रेष्ठतम गुरु असे मानणाऱ्या कार्यवाद्यांनी जीवनाच्या शाश्वत मूल्यांचा विचार केलेला नसला तरी त्यांनी मानव जातीच्या कल्याणास दिलेले महत्त्व असाधारण असे आहे. [illegible] या कार्यवादातून `अनुभव प्रामाण्य` हे मूल्य मानवजातीला असे प्राप्त

झाले तसेच अनुभवाला प्रमाण मानण्यासाठी अनुभव घेणे गरजेचे आहे आणि या गरजेतूनच ' प्रयोगशीलता ' हे मूल्य रुजले आहे. विचार कृतीत उतरल्या-नंतरच तो सार्थक होतो. अशी स्पष्ट भूमिका असल्याने ' कृतीशीलता ' या मूल्याला महत्त्व आहे. तसेच बुध्दीनिष्ठा आणि बुध्दीनिष्ठ आचारावर ही मूल्ये येथील मानवी समाजात स्वाभाविक कारणीभूत झाली. ' अर्थ उपयोगिता ' आणि ' अर्थ सापेक्षता ' या अनुभववादी (कार्यवादी) लोकांची महत्त्वाची मूल्ये ठरली. कर्तृत्ववान माणसे समाजाला ते बदलून टाकू शकतात याची खात्री झाल्याने श्रेष्ठ माणसांचा आदर समाजात मान्यता प्राप्त झाली. आदर्श हा पुढे आध्यात्मात किंवा निर्वाणात शोधण्याचा नसल्याने वर्तमानातील हेतू आणि कृतीतील चांगलेपण हेच जीवन सार्थकी लावण्याचे महत्त्वाचे ठरले. त्यामुळे स्वावलंबनाला महत्त्व प्राप्त झाले. ' स्वयं-शिक्षण ' व ' स्वयं शिस्त ' ला महत्त्व प्राप्त झाले.

### २.२.४ वास्तववादाची मूल्यविषयक भूमिका :

वास्तववादींनी जगाच्या मागे निश्चित योजना आहे हे मान्य करून कालप्रवाहाच्या कार्यकारणभावाचा शोध घेण्याचा बाळगला आहे यातून ' ज्ञानसाधना ' हे मूल्य जन्मले आहे. भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील विश्वासनीय माणसांनी सांगितलेली मूल्ये स्वीकारावयास वास्तववादींची संमती असल्याने ' श्रेष्ठादर ' आणि ' इतिहास व संस्कृती आदर ' ही मूल्ये येथील मानवी समाजात प्राप्त झाली आहेत. आचरणातील परिश्रमालाच वास्तववादी महत्त्वाचे स्थान देत असल्याने प्रेम, सहानुभूती, बंधुत्व, आत्मसंयमन, दूरदर्शीपणा या मूल्यांची त्यांना सामाजिक स्वास्थ्यासाठी आवश्यकता भासते. ज्ञानसाधना आणि भावसाधना यांचा व्यक्तिमत्त्वामध्ये संगम झाला पाहिजे ही त्यांची मनीषा असल्याने त्यांनी सामाजिक जीवनातील नातेसंबंधांसाठी ' विज्ञाननिष्ठता ' या मूल्यांबरोबरच महत्त्वाचे स्थान दिले आहे.

२.२.५ <u>अस्तित्ववादाची मूल्यविषयक भूमिका</u> :

अस्तित्ववादाचा उगम मुळी भौतिक प्रगतीने धारण केलेल्या मानवी हताशलेल्या अगतिकतेतून झाला आहे. मनुष्याचे ' व्यक्तित्व ' हे सर्वोच्च आहे ही अस्तित्ववादाची भूमिका आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसी पार्श्वभूमीला विरोध म्हणून अस्तित्ववाद उदयाला आला आहे. म्हणूनच वस्तुनिष्ठतेपेक्षा ' आत्मनिष्ठा ' या मूल्याला ती प्राधान्य देते. विज्ञान युगाने निर्माण केलेल्या यंत्रांतून माणसाची सोडवणूक करण्याची मनिषा अस्तित्ववाद बाळगून आहे. अस्तित्व म्हणजे केवळ जगणे नसून मनुष्याचे जीवन समृद्ध, कलात्मक, आत्मजागृत व प्रगतीकारक होणे असे या अस्तित्ववादाला वाटते. म्हणून व्यक्तीची अस्मितेची संपन्नता व विवेकनिष्ठा ही त्यांना आदराची बाब वाटते. अस्तित्वाचे स्वरूप मानवी बुद्धीला न कळणारे असल्याने ते श्रद्धेनेच समजून घ्यावे लागते, असे मत ते मांडतात. त्यामुळे ' श्रद्धा ' या मूल्याची पुन:स्थापना अस्तित्ववादी करू इच्छितात. त्यासाठीच त्यांना नैतिक व धार्मिक शिक्षणाची गरज वाटते. ' श्रमनिष्ठा ' हे मूल्य प्रयत्नपूर्वक जोपासले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. ' अखंड मानवता ' मानवजातीमध्ये रुजविण्यासाठी मानव्यशास्त्रीय विषय अध्यापनात आणले जावेत असे त्यांना वाटते.

२.२.६ <u>तार्किक अनुभववादाची मूल्यविषयक भूमिका</u> :

तार्किक अनुभववाद हा प्रत्यक्ष निरीक्षणातून प्रकट झालेल्या अनुभवाला महत्त्व देत असल्याने धर्म, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण याला त्यांचा विरोध आहे. पण मानवकल्याणाच्या संदर्भात तार्किकतेने विचार झाला पाहिजे. बुद्धीनिष्ठेने हा विचार करता येतो. म्हणूनच तार्किक अनुभववादी हे शास्त्रीय मानवतावादाचे पुरस्कर्ते ठरतात.

या सर्व तत्त्वप्रणालींचा विचार केल्यानंतर असे आढळून येते, की मानवी जीवनाच्या विकास क्रमात प्रत्येक तत्त्वप्रणालीने आपल्या मानवी कल्याणाच्या विचाराचे आणि मूल्य निर्मितीचे कार्य स्वतंत्रपणे केलेले आहे. त्यामुळे मूल्यांची संख्या आजच्या आधुनिक युगामध्ये वाढलेली दिसते. मुख्यतोऽ मूल्ये ही मानवी जीवन प्रगतीची प्रतिके आहेत असे म्हटले ते यासाठीच. न्याय-स्वातंत्र्य आणि समता ही मूल्य-त्रयी देखील व्यक्ती मनाच्या स्वातंत्र्य कल्पनेतून निर्माण झालेली आपणास पहावयास मिळते आणि लोकशाही पध्दती धारण करणारे देश त्या मूल्यांचा आदर करताना पहावयास मिळतात.

मानवी जीवनाचा हा विकासात्मक आढावा मूल्यांच्या संदर्भात साकल्याने घेण्यापाठीमागे आणखी एक भूमिका आहे. काही लोक मानवी जीवन विकासात निर्माण झालेले ( Isms ) 'वाद' आहेत त्यांच्याशी एकनिष्ठ राहतात व मानवी जीवननिष्ठा विसरतात. त्यामुळे घडते काय, की वादी-प्रतिवादींचा संघर्ष समाजामध्ये निर्माण होतो. जडवादी आध्यात्म-वादींना शह देण्याचा प्रयत्न करतात, तर निरीश्वरवादी अस्तित्ववादींना उत्तर-प्रत्युत्तर करण्याचा प्रयत्न करतात. कोणताही 'वाद' आपल्या अस्तित्वासाठी झटत असला तरी 'वादी' म्हणवून घेणाऱ्यांना कोणताही 'वाद' म्हणजे मानवी जीवन विकासातील एक टप्पा असतो याचा विसर पडू नये. प्रत्येक वादातील मानवी जीवनाचे उचित आकलन मनुष्याने [illegible] जाणलेले आहे हे मान्य केले पाहिजे. मूल्यांच्या बाबतीत विचार करताना या गोष्टींचा विचार साकल्याने झाला पाहिजे. नाहीतर शहाणे म्हणवून घेणाऱ्यांनीच मूल्ये माझी चांगली, तुमची वाईट किंवा अपूर्ण, असा वाद घालत बसल्यास सामान्य संभ्रमात पडण्याची शक्यता असते. ही सामान्यांची संभ्रमावस्था मूल्यसंवर्धनातील निष्क्रियतेला आमंत्रण देते. म्हणून मूल्य-संघर्षातील आपली भूमिका ही सुस्पष्ट, विचारी माणसाची असली पाहिजे.

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यन्त मानवी संस्कृतीमध्ये जे तात्त्विक पातळीवर विचारमंथन झाले आहे ते एका अर्थाने मूल्यांच्या निर्मितीचे केंद्र ठरले आहे. अर्थात मानवी जीवन आणि मूल्ये यांचा अन्योन्य संबंध त्यामधून प्रतीत होताना दिसतो. मानवी संस्कृतीचा सारभाग मूल्यांच्या जोरावर खांबावर उभा आहे असे म्हटले तर ते वावगे होऊ नये. म्हणजेच मूल्ये हे मानवी जीवनाचे पायाभूत आधारस्तंभ आहेत हे लक्षात आले की, ' मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान काय ? ' अशा अल्पमतीला कुठला प्रश्न कोणालाही संभ्रमावस्थेत टाकू शकत नाही. परंतु आधुनिक मानवी जीवनातील क्लिष्टता, गुंतागुंत, संघर्ष यामुळे मात्र हा प्रश्न गांभीर्यपूर्वक विचारात घ्यावा लागत आहे. त्यामुळे आधुनिक मानवी जीवनातील गुंतागुंतीचा वेध घेऊन मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान व गरज कोणती हे स्पष्ट करावे लागणार आहे.

## २.३ मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान :

' जन्म मिळे त्यात जीव सुखावला न पावे
जे सुंदर, जे आर्य तेथे मन धावे '[६]

' मनीषा ' शांता शेळके

ही मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्तीच अखिल मानवी प्रगतीची पायाभूत ठरली आहे हे खरे आहे. पण मिडास राजाच्या सुवर्णलोभाप्रमाणे ही शक्ती अलक्षित भौतिकतेत झाल्याने केवळ सुखाच्या शोध आणि वेध घेण्याच्या गडबडीत माणूस स्वत्व विसरून जातो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि भौतिक प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोचू पाहणारा मानव म्हणूनच कलहयुक्त जीवन जगू लागला आहे. अशावेळी त्याला

' अमृतमय मरे सुध्दा परी
का वणवण फिरती भाजारी '७

– बा.भ. बोरकर

या बा.भ. बोरकरांच्या शब्दांमध्ये आजच विचारणा करणे गरजेचे भासू लागले आहे.

विज्ञान युग, यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण या गोष्टींनी माणसाला पराकोटीची भौतिक संपन्नता बहाल केली असली तरी अफाट लोकसंख्येची निर्माण झालेली महागाई, त्यातून झोपडपट्टीतून राहणारे जीव, "Money is the greatest power in the world" ही उक्ती आजच्या युगाचा गरजेची उक्ती ठरल्याने विस्कटलेले सांसारिक संबंध, कौटुंबिक स्वास्थ्यापासून वंचित झालेला माणूस, वाढणारी महागाई, यामुळे माणसाचे माणूस म्हणून न राहिलेले अस्तित्व मानवी जीवनमूल्यांच्या संकल्पनावर कुऱ्हाड पाडत आहे. जीवनकलह इतका संघर्षमय झाला आहे, की माणसातील माणूसपण विसरून माणूस इतर प्राण्यांप्रमाणेच उदर भरणाच्या आणि वासनातृप्तीच्या पाठी लागलेला आपल्याला पहावयास मिळतो. समाजामध्ये वाढू लागणारी स्वार्थांधवृत्ती आणि रात्रंदिवस होणारे बलात्कार ही या मानवी समस्येची प्रतिके आहेत.

मानवी जीवन संघर्षातून आत्यंतिकतेने निर्माण झालेल्या आसक्तीतून ही मानवी संस्कृतीचा एकीकडे विध्वंस वाढू लागताना भौतिक संपन्नतेचा वापर किती प्रमाणात कशा पध्दतीने करावा याचा विधीनिषेध न बाळगल्याने मानवी जीवनामध्ये ' केवळ ' चे स्तोम माजू लागले आहेत. त्यामुळे समाजामध्ये आजकाल लोभ, पोट आणि पैसा यांचे प्रमाण वाढलेले दिसते. आईवडील असा व्यक्ती ज्येष्ठांचा अनादर करून केवळ पोटभर नाहीत तर मानवी जीवनस्वास्थ्य बिघडवत असताना पहावयास मिळतात.

कामामध्ये आराम मानणारे, आराम अगाऊ हवे असताना परकष्टातून जीवन कंठण्याची धडपड करणारे असंख्य तरुण आज दिसतात. अर्थात कष्ट करण्यामागील निरुत्साहवृत्ती आपल्या लोकांमध्ये कमी होत जाऊन सदैव भोगलालसी वृत्ती वाढत असल्याचे दिसत आहेत.

राज्यकर्त्यांच्या स्वार्थी वृत्तीच्या वागण्या सर्वसामान्यांना अनुकरणीय वाटतात, प्रतिष्ठित मानले गेलेले हे लोक आहेत ते कसे, तसे आणि तुम्ही आहेत हे ज्यावेळी सामान्य जनतेला कळायला लागते त्यावेळी त्यांच्या अंतर्मनातही त्याच पद्धतीची संस्कृतीहीन जीवनपद्धती संक्रमित होत राहते. ज्या कामगारांनी कारखाने वैभवाला आणायचे असतात, राष्ट्रीय उत्पन्नात भर घालायची असते, त्यांच्याच बाबतीत ' काम गार बोंब फार ' या प्रकारचा वाक्प्रचार प्रचलित होताना दिसतो.

घरातील व्यवहारातही सर्वसामान्य लोकांच्या जीवन कंठण्याच्या वृत्तीमध्ये पडलेला फरक ही मूल्यहीनतेची झलक म्हणून पाहता येईल. एखादी एक माता आपल्या पुत्राने खोटे बोलू नये असे त्याला बजावत असते. त्याचवेळी त्यांच्याकडून तरी काही चूक घडली तर त्याचे गुन्हेगार आपल्या शिक्षकांनी ठरवायला देखील कमी करीत नाही. अशी ही कर्तव्य तत्पर माता मात्र खिडकीतून, शेजारच्या मावशी आपल्याकडेच येत असल्याचे खात्री करून त्यांना टाळण्यासाठी म्हणून अभ्यास करत असलेल्या आपल्या पुत्राकडे येऊन त्याला बजावून सांगते, ' त्या शेजारच्या मावशी येताहेत, त्यांना बाहेरच्या बाहेरच मी घरी नाही म्हणून सांग. ' या त्यांच्या म्हणण्याने पुत्राच्या अंतर्मनात खऱ्या-खोट्याचा द्वंद्व निर्माण होतो आणि त्याचे 'अनुकरण' ते ही असा धारणा होते व त्यातूनच खोटेपणा वाढीस लागते.

त्याचप्रमाणे जीवन सुखसंपन्न करण्यासाठी कोणते साधन योग्य, अयोग्य याबाबती विचार आधुनिक काळात होईनासा झाला आहे. साधन-शुचितेचे भान कुणाजवळी राहिलेले नाही त्यामुळे मटका, दारूधंदा, रेस चालविणारे लोक प्रतिष्ठित म्हणून मान्यता प्राप्त होत आहेत. व्यक्तीचे मन हे संवेदनशील असते. ही संवेदनशीलताच घाणेरड्या वाईट गोष्टींच्या संक्रमणासाठी उपयुक्त ठरत असते. सातत्याने व्यक्तीमनावर वाईट गोष्टींचा प्रभाव पडला तर त्याच त्याच्या अंतर्मनात संक्रमित होतात आणि संपूर्ण मानवी समाजच विकृतीच्या फेऱ्यात अडकतो. आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

महात्मा गांधीनी सार्वजनिक जीवन क्षेत्रातील अनैतिकतेचे वर्णन १९२४ साली समाज जीवनातील सात दोष दाखवून केले आहे.

१. तत्त्वाविना राजकारण
२. श्रमाविना संपत्ती
३. नीतीविना व्यापार
४. चारित्र्याविना शिक्षण
५. सदसद्विवेकबुध्दीविना विलास
६. मानवतेविना विज्ञान
७. त्यागाविना पूजा.[28]

हे सात दोष आजच्या मानवी समाजाचे उत्कृष्ट वर्णन करू शकतात.

या पार्श्वभूमीवर आधुनिक मानवी जीवनात मूल्यांच्या संक्रमणाला आणि संवर्धनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. अणुयुध्दाचे अस्त्र तयारी करून मानवी विध्वंसाला सिध्द झालेल्या माणसाला तेथून परावृत्त

करायचा असेल तर त्याच्या अंतर्मनात ' माणुसकी ' हे मूल्य रुजवावेच लागेल. कर्तव्याची जाणीव आजच्या युवकांत तुम्ही आम्ही बिंबविण्याचा प्रयत्न केला नाही तर हा युवक दिशाहीन भरकटत जाण्याची शक्यता अधिक आहे. मूल्ये ही मानवी जीवनाची आधार आहेत हे म्हणणे जो पर्यंत लोकांमध्ये स्थिरावत नाही तोपर्यंत संस्कृती विकृतीचा हा तराजू विकृतीच्या बाजूनेच अधिक झुकण्याची शक्यता आहे. अर्थात याचे प्रत्यंतर आपल्याला आजच्या समाजपरिस्थितीमध्ये आलेले आहे. म्हणून मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान अनन्यसाधारण आहे असे म्हणावे लागते.

## २.४ <u>मूल्य संकल्पना – अर्थ</u> :

मूल्यांचे मानवी जीवनातील अनन्यसाधारणत्व आपण पाहिल्यानंतर ती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवायचीत कशी, बिंबवायचीत कशी याचा विचार आपण करणार आहोत.

ज्ञानेश्वरांनी ' ज्ञानेश्वरी ' मध्ये अहिंसावाद्याची लक्षणे सांगत असताना, अहिंसावादी ओळखावा कसा या संदर्भात पुढील ओव्या दिलेल्या आहेत :

ते स्वयंभ दीठले । अहिंसे रूप निवडले ।
उठलिया आंकुले । ज्ञान जेवि ॥
परि ते अविस्तरेनि जाणे । आणिजे आचरतेनि खुणे ।
जैसी कसवटी सोने । वानियाते ॥ [1]

सुवर्णाचे सुवर्णपण हे त्याच्या अग्निपरीक्षेतून जसे स्पष्ट होते तसेच अहिंसावाद्याची ' अहिंसा ' ही त्याच्या प्रत्यक्ष आचरणातून प्रत्ययास येत असते. आचरणाची अग्निपरीक्षा अहिंसावाद्याला द्यावी लागते.

' अहिंसा ' हेच मुळी एक मूल्य आहे. त्या मूल्याचे संक्रमण अहिंसावादी म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींमध्ये झाले की नाही हे पाहण्याचे एकमेव साधन म्हणजे त्याचे आचरण किंवा वर्तन होय. याचाच अर्थ मूल्य संक्रमणाच्या प्रक्रियेमध्ये प्रथम विचार करावा लागतो तो आचरणाचा, वागण्याचा व वर्तणुकीचा.

## २.५ मूल्यसंक्रमण व शिक्षण यांचा अन्योन्य संबंध :

मनुष्याला सद्वर्तनी करणे हे मूल्यसंक्रमणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट लक्षात घेतल्यानंतर ' शिक्षण म्हणजे वर्तनबदल ' या शिक्षणाच्या व्याख्येकडे लक्ष जाते आणि मूल्यसंक्रमण आणि शिक्षण यांचा अन्योन्य संबंध लक्षात येतो.

ग्रीक तत्त्ववेत्ता ' प्लेटो ' (ख्रि.पू.४२७-३४७) याने " सत्य, शिव, सुंदर " ही जीवनाची अंतिम मूल्ये, ती समजण्याची व अनुसरण्याची पात्रता मनुष्याला आणून देणारे ते खरे शिक्षण होय. "[१०] असे म्हटले आहे. याचाच अर्थ त्याच्या मते मुलांमधील उपजत प्रवृत्तींचे उदात्तीकरण करून त्यांना चांगली माणसे बनवणे हे शिक्षणाचे कार्य होय.

कॉमेनियस याने (इ.स. १५९२-१६७१) तर " शिक्षण म्हणजे संपूर्ण मानव्याचा विकास होय. "[११] अशी व्याख्या करून Knowledge, Virtue and Piety ही शिक्षणाची ध्येये त्याने मानलेली आहेत.

याच पद्धतीने बालोद्यान पद्धतीचा जनक तत्त्ववेत्ता फ्रेडरिक फ्रोबेल (१७८२-१८५२) यांनी " श्रद्धा, पावित्र्य आणि सातत्य यांनी युक्त असे जीवन निर्माण करणे "[१२] हा शिक्षणाचा हेतू मानला आहे तर जॉन रस्किन (१८१९-१९००) यांनी " ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे, जे लोकांना ज्ञात आहे ते शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर ज्यांना वागता येत नाही, त्यांना नीट वागावयास शिकविणे "[१३] असे म्हटले आहे.

या सर्व व्याख्यांचा मतितार्थ शिक्षण म्हणजे सुसंस्कार असा होतो. अर्थात मूल्यसंक्रमण म्हणजे देखील सुसंस्कार करणे असाच अर्थ अभिप्रेत आहे. याचा अर्थ शिक्षणाचा एक अर्थ मूल्य संक्रमण असा होतो.

गेटस यांच्या मताप्रमाणे[14] शिक्षण म्हणजे "Progressive change in the behaviour." होय. अर्थात हा बदल शारीरिक, मानसिक व बौध्दिक (ज्ञानात्मक) पातळीवर अपेक्षित असतो.

मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात बौध्दिक (ज्ञानात्मक) पातळी बरोबरच मानसिक विकासात्मक बदलाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. हा विकासात्मक बदल शिक्षणाने व्यक्तीमध्ये सक्षमता घडत राहील तसतसे मूल्यसंक्रमण होत राहील असे म्हणता येते. हा विकासात्मक बदल क्षमतेने हळूवार घडत असतो त्यासाठी मूल्यसंक्रमणामध्ये सातत्य राखणे फार गरजेचे असते कारण शिक्षण प्रक्रियेची खालील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये त्यासाठी विचारात घ्यावी लागतात ती अशी -

१) शिक्षण ही एक आजन्म चालणारी अखंड प्रक्रिया आहे.

२) शिक्षण ही एक मौलिक व सर्वपूर्ण प्रक्रिया आहे.

या वैशिष्ट्यांचा विचार केला असता 'मूल्यसंक्रमण' ही देखील एक शिक्षणप्रक्रिया आहे हे निश्चित करून जाणल्याने तिचा पाठपुरावा करावा लागतो.

## २.६ मूल्यसंक्रमणात शिक्षण आणि शिक्षक यांची भूमिका :

मूल्यसंक्रमण आणि शिक्षण यांचा असा अन्योन्य संबंध असतात पाहता, मूल्यसंक्रमण म्हणजे सुसंस्कार घडविणे, म्हणजेच सद्वर्तनी व्यक्तिमत्त्व घडविणे असा अर्थ होतो. सद्वर्तनी व्यक्ती घडविण्यासाठी सिद्धी मानसिकता अभ्यासाची लागते. कोणतीही व्यक्ती ही निसर्गतत्व असल्याने अनेक

ब-या वाईट सत्प्रवृत्तींचा केंद्र असते. अनेक सत्प्रवृत्ती तिच्यामध्ये वसत असतात. तिच्या अंतर्मनात जी सत्प्रवृत्ती ज्या पद्धतीने अधिराज्य गाजविण्याचा प्रयत्न करते त्यावरून तिचे वर्तन घडण्याची शक्यता असते.

याचा अर्थ सत्प्रवृत्तींना योग्य दिशा देणे आणि वळण लावणे हा मूल्यसंक्रमणातील महत्त्वाचा टप्पा ठरतो. अर्थात हे काम म्हणतो तितके सोपे नाही. पण सातत्यपूर्ण प्रयत्नातून कळस गाठणे अशी करणा-या माणसाला अशक्य असे काही नाही. आत्मविश्वास प्रत्येकाच्या आणि विशेषत: शिक्षकाच्या ठायी असला पाहिजे. आत्मविश्वास हृदयीचा शिक्षक म्हणजे मूल्यसंक्रमणाच्या वाटेवरील मार्गदर्शक दिवा मानावा लागतो ते याचसाठी. म्हणून अखंड परिश्रमशीलता अत्यावश्यक ठरते.

तसेच मूल्यसंक्रमण म्हणजे काही मूर्त गोष्ट नव्हे की, काही विशिष्ट गोष्टी केल्या म्हणजे ती प्राप्त होते. ` मूल्य ` ही संकल्पना अमूर्त आहे. तिचे संक्रमण एका सजीव असणा-या व्यक्तीमध्ये करायचे असते त्यामुळे मूल्य-संक्रमण करणा-या व्यक्तीला संयमशीलता बाळगावी लागते. मूल्यसंक्रमणाच्या ध्येयावर अढळ निष्ठा ठेवावी लागते. तरच मूल्यसंक्रमणात यशसिद्धी अधिक लाभण्याची शक्यता असते.

याचाच अर्थ मूल्यसंक्रमण विद्यार्थ्यांमध्ये करू इच्छिणा-या अध्यापकामध्ये अखंड परिश्रमशीलता संयमशीलता आणि दूरदृष्टीपणा या मूल्यांची आत्यंतिक गरज आहे हे प्रत्येक शिक्षकाने ध्यानात ठेवले पाहिजे.

सत्प्रवृत्तींना योग्य दिशा आणि वळण लावण्यासाठी मूल्यांना अनुसरून अनेक अनुभवांची मालिका विद्यार्थ्यांच्या समोर ठेवावी लागते आणि हे काम जाणीवपूर्वक सातत्याने करावे लागते. उदा., ` प्रामाणिकपणा ` हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करावयाचे असल्यास त्याला थोरामोठ्यांच्या

जीवनातील अनेक उदाहरणे कथन, नाट्यात्मक रुपामध्ये देता येतील. प्रत्यक्ष व्यवहारातील प्रसंगातून प्रामाणिकपणा बद्दली आस्था वाढीस लावता येईल. शालांतर्गत कार्यक्रमाद्वारे अनेक सहेतुक अनुभव त्याला देता येईल. या अनुभवांच्या मालिकेतून त्याच्या अंतर्मनात ` प्रामाणिकपणा ` या मूल्याबद्दल आस्था निर्माण होईल. पण केवळ आस्था निर्मितीमुळे मूल्यसंक्रमण झाले असे म्हणता येत नाही. कारण ही आस्था क्षणाकालीन असू शकते. म्हणून अनेक अनुभवांच्या मालिकेतून प्रामाणिकपणाची त्याला सवय कशी होईल याचा शोध आणि बोध शिक्षकाने सातत्याने घेतला पाहिजे. सवयीचे रुपांतर व्यक्तिमत्वातील स्थायीभावामध्ये झाले आणि व्यक्तीच्या वर्तनामध्ये कायम स्वरुपी प्रामाणिकपणा स्थिरभावरुप धारण करुन प्रतिबिंबित होऊ लागला की मग मूल्यसंक्रमण झाले असे आपल्याला म्हणता येते. म्हणून मूल्याधिष्ठित अनुभवांची मालिका सातत्याने विद्यार्थ्यांसमोर येत राहणे आणि आपल्या आचरणातून ती मूल्ये जपणे या गोष्टी मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत.

२.७ समारोप :

या प्रकरणामध्ये आपण मूल्य म्हणजे काय, मूल्यनिर्मितीचा पूर्वेतिहास, मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान आणि महत्व, मूल्यसंक्रमण आणि शिक्षण यांचा अन्योन्य संबंध आणि शिक्षण आणि शिक्षक यांची मूल्यसंवर्धनासंदर्भातील भूमिका या संदर्भात विचार केलेला आहे. आता पुढील प्रकरणामध्ये सत्यवेशी निगडित प्रकाशित व संशोधित साहित्याचे समालोचन केले आहे.

## संदर्भ सूची


1) Dr. M. Lakshmi Kumari (Ed.), Indian Education, Vivekananda Kendra Patrika, Aug. 1986, Madras : Triplicane, Vivekanand Rock Memorial and Vivekanand Kendra, 1986.

२) लीला पाटील (संपादक) " मूल्यशिक्षण " (विशेषांक) कोल्हापूर : श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी प्रकाशन, १९८४, लेख, लीला पाटील, मूल्यशोधन व मूल्यसंवर्धन, परिशिष्ट १, पृ. ४.

३) वि.ह. सहस्त्रबुद्धे, शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन, प्रथम आवृत्ती, पृ. १५, पुणे : साधना प्रकाशन, १९८४.

४) G. Terry Page and J.B. Thomas with A.R. Marshall, International Dictionary of Education, London : The English Language Book Society and Kogan Page, 1979.

५) वि.दा. करंदीकर, मृद्गंध (काव्यसंग्रह), मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९६२.

६) शांता शेळके, गोंदण (काव्यसंग्रह), मुंबई : अभिजित प्रकाशन, १९७५.

७) मीरा पाळणीकर (संपादक), थोरकांची कविता, मुंबई : मौज प्रकाशन, १९६०.

८) वि.ह. सहस्त्रबुद्धे, शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन, पुणे : साधना प्रकाशन, १९८४ या पुस्तकात नोंद केल्याप्रमाणे, पृ. ३

९) दांडेकर गो.नी., सार्थ श्री ज्ञानेश्वरी अध्याय १३, ओवी क्र. २४४,२४५,
पुणे : मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९८९.

१०) पारसनीस, शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका :
पुणे : नूतन प्रकाशन, १९८७, पृ. क्र. ३,४

११) तत्रैव.

१२) तत्रैव.

१३) तत्रैव.

१४) तत्रैव.